# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-१२२ दिनांक - २९/०३/२०२४

**गावठी हातभट्टीची दारु तयार करणाऱ्या इसमावर छापा घालुन त्यास अटक करुन गावठी दारुची भट्टी उदवस्त करण्यास पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.**

आगामी लोकसभा निवडणुक २०२४ च्या अनुशंगाने पोलीस ठाणे हद्दीत अवैद्य धंदयावर कठोर कारवाई करण्याबाबत मा. पोलीस आयुक्त सो, यांचे सक्त आदेश झाले आहेत. त्या अनुशंघाने पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत डोंगरावर झाडाझुडपात बिलालपाडा संतोषभवन नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर येथे अवैद्य रित्या गावठी दारु तयार केली जात असल्याबाबत गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशिर माहिती प्राप्त झाली होती.

सदर बातमीच्या अनुशंगाने पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र वनकोटी यांनी स्व:ता गुन्हे प्रकटीकरण पथकासह आज दिनांक २८/०३/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वा. च्या सुमारास डोंगरावर झाडाझुडपात बिलालपाडा संतोषभवन नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर येथे जाऊन सदर ठिकाणी छापा मारुन तेथिल अवैद्य गावठी दारु तयार करण्यासाठी तयार केलेले १,३६,४००/- रुपये किंमतीचे ३,३०० लिटर मिश्रण युक्त दुर्गंधी द्रव्य व २२ प्लास्टीकचे बॅरल जागीच नष्ट करण्यात आले आहे. तसेच ६,१००/- रुपये किंमतीचे ॲल्युमिनीयम चे दोन टोप व पत्र्याचा झारा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गावठी हातभट्टी चालविणारा आरोपीत प्रदीप रामा शिंगडे, वय ३० वर्षे, रा. नालासोरापारा पुर्व ता. वसई जि. पालघर यास अटक करण्यात आली असुन सदरबाबत पेल्हार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३६७/२०२४ महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ग) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/सोपान पाटील, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, पो.अं./रवि वानखेडे, संजय मासाळ, मिथुन भोईर, निखील मंडलिक, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.